ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख १२ सप्टेंबर, १९५१ अंक ३७

## विविध माहिती

**स्वप्नांचा अर्थ सांगण्याची सोय**—पॅरिसमधील टेलिफोन सर्व्हिसनें आपल्या ग्राहकांच्या स्वप्नांचा अर्थ सांगण्याची सोय केली आहे. ह्या कामासाठीं ग्राहकांकडून वर्षासाठीं अवघी तीन रुपये फी घेण्यांत येते. स्वप्नांचे अर्थ सांगण्यासाठीं तज्ज्ञ मानसशास्त्रज्ञ मुद्दाम ठेवण्यांत आले आहेत. ग्राहकांची सेवा करणें, एवढाच हेतु ह्या उपक्रमामागे आहे.

**रशिआला माशांची निर्यात**—रशिआला रेड हेरिंग ह्या जातीचे मासे निर्यात करण्याचें ब्रिटननें पुन्हा चालू केलें आहे. १९४० सालापासून हे मासे पुरविण्याचें ब्रिटननें बंद केलें होतें.

**राजस्थानला मध्यवर्ती सरकारची मदत**—राजस्थानमधील मागासलेल्या जातींना मदत म्हणून मध्यवर्ती सरकारनें राजस्थान सरकारला चालू वर्षी ५ लाख रु. मंजूर केले आहेत असें अधिकृत रीत्या जाहीर करण्यांत आलें आहे.

**अंदमानांतील जंगलांचा उपयोग**—उत्तर अंदमान बेटांतील जंगलांचा उपयोग करून घेण्यासाठीं भारतीय सरकारनें मे. रे अँड कंपनबरोबर २५ वर्षे मुदतीचा करार केला आहे. जंगलांचा विस्तार सुमारें ७०० चौरस मैल आहे. कंपनीला दरवर्षी सुमारें ७५,००० टन लाकूड मिळूं शकेल अशा हिशेबानें तिनें भारतीय सरकारला दरवर्षी ५० लाख रुपये रॉयल्टी देण्याचें कबूल केलें आहे.

**ग्रामोद्योगाच्या मालासाठीं बाजारपेठ**—ग्रामोद्योगाच्या मालाला बाजारपेठ मिळवून देणाऱ्या उद्देशानें सांगली येथें एक विक्रीकेंद्र उघडण्यांत आलें आहे. ह्या केंद्राचें खेळतें भांडवल २५,००० रुपये आहे. बागलकोट, विजापूर, नाशिक, येवले, कोल्हापूर, नांदेड, पुणें, मुंबई इत्यादि ठिकाणचा माल विक्रीकेंद्रांत येऊं लागला आहे. केंद्राची व्यवस्था पहाण्यासाठीं सहा जणांची एक कमिटी नेमण्यांत आली आहे.

**तंतुवाद्यांचा मोठा संग्रह**—प्रो. फ्रिडबर्ग नांवाच्या जर्मन संगीत तज्ज्ञाला आणि वादनकाराला द. भारतीय संगीताची फार आवड आहे. त्यांनीं सुमारें १५० व्हायोलिन्स आणि ५० ते १०० इतर तंतुवाद्यें जमा केलीं आहेत. त्यापैकीं कांहीं तर ३५० वर्षांइतकीं जुनीं आहेत. जुनीं तंतुवाद्यें जमविण्याचा त्यांना नादच आहे. हीं सर्व तंतुवाद्यें एका दाक्षिणात्य बोलपट कंपनीला विकण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. सर्वसंग्रहाची किंमत सुमारें ८,००० पौंड होईल.

**ऐतिहासिक कागदपत्रांचें चित्रीकरण**—भारतीय इतिहासावर नवा प्रकाश टाकणारे अनेक महत्त्वाचे कागदपत्र परदेशांत विखुरलेले आहेत. ह्या कागदपत्रांचे सूक्ष्मदर्शी चित्रपट घेण्याची एक योजना आखण्यांत आली आहे. ती पूर्ण झाल्यावर इतिहासाच्या अभ्यासकांची फार मोठी सोय होईल. प्राथमिक मदत म्हणून भारतीय सरकारनें २,००,००० रुपये मंजूर केले आहेत.

**प्रार्थनेपेक्षा शेतीचें कष्ट मोलाचे**—झोरोस्तर ह्या प्रसिद्ध पारशी धर्मगुरूनें प्रार्थना व शेती ह्यासंबंधीं पुढील तुलना केली आहे. तो म्हणतो, "जो मनुष्य आपलें शेत कष्टपूर्वक व काळजीनें पेरतो त्याला १०,००० प्रार्थना केल्यापेक्षांहि अधिक पुण्य प्राप्त होतें" अर्थोत्पादनाचें महत्त्व खऱ्या धार्मिकांना उत्तम रीतीनें पटलें, असें ह्यावरून दिसून येतें.

**सीलोनमध्यें टायर्सचा कारखाना**—सालीना ७५,००० टायर्स तयार करूं शकणारा एक कारखाना सीलोनमध्यें लवकरच काढण्यांत येणार आहे. कंपनीचें नांव नॅशनल जनरल टायर कॉर्पोरेशन असें असून त्यांत एक अमेरिकन कंपनी, एक सीलोनी कंपनी आणि सीलोनचें सरकार असे तीन भागीदार राहतील. कॉर्पोरेशन बॅटऱ्याहि तयार करणार आहे.

**रेल्वेमधील चोऱ्यांचा भुर्दंड**—भारतीय रेल्वेवर होणाऱ्या लोकांच्या वस्तूंच्या चोरीविषयीं नुकसानभरपाई म्हणून १९४९ सालीं १८१ लाख रुपये आणि १९५० सालीं १७८ लाख रुपये द्यावे लागले, असें मध्यवर्ती विधिमंडळांत वाहतूक मंत्र्यांनीं सांगितलें.

**स्वतःच्या मालकीचा टेलिफोन**—ता. १० सप्टेंबरपासून आपल्या मालकीचा टेलिफोन घेण्याची सोय बंगळोर शहराला लागू करण्यांत आली आहे. ह्या योजनेप्रमाणें अर्जदारानें प्रथम २,००० रुपये भरावयाचे आहेत. बंगळोर शहरांत असे २,००० टेलिफोन देण्यांत येतील. वरील योजना १५ मोठमोठ्या शहरांना लागू करण्यांत आली आहे.

**अमेरिकेंतील श्रम करूं शकणाऱ्यांची संख्या**—जुलै १९५१ मध्यें अमेरिकेंतील श्रम करू शकणाऱ्या माणसांची संख्या ६,२८,००,००० इतकी होती. ऑगस्ट १९५२ मध्यें ही संख्या ६,५०,००,००० इतकी होईल. त्यापैकीं १३ टक्के कामगार म्हणजे सुमारें ८५,००,००० लोक संरक्षण-विषयक धंद्यांत काम करणारे असतील. ह्या संख्येंत लष्करांतील ३५,००,००० सैनिकांचा समावेश करण्यांत आलेला नाहीं.

### " किर्लोस्कर " चा दिल्ली विशेषांक

किर्लोस्कर मासिकानें सप्टेंबर १९५१ चा अंक दिल्ली मराठी साहित्य मंडळ यांच्या सहकार्यानें दिल्ली विशेषांक म्हणून प्रसिद्ध केला आहे. दिल्लींतील 'महाराष्ट्रीयांची' वाढती लोकसंख्या व तेथील महाराष्ट्रीय संस्थांनीं व महाराष्ट्रीयांनीं प्रस्थापित केलेलें स्वतःचें वैशिष्ट्य ह्याची कल्पना बाहेरील लोकांना असण्याचा संभव नाहीं. महाराष्ट्रीयांच्या अनेक सद्गुणांबरोबर त्यांचे कांहीं दुर्गुणहि आहेत; तर कांहीं सद्गुण विशिष्ट परिस्थितींत नुकसानकारक ठरतात. दिल्लीसारख्या शहरांतील वातावरणापासून त्यांनीं घेतलेला बोध इतरांनाहि समजणें आवश्यक आहे. प्रस्तुत विशेषांकांत भारताच्या राजधानींतील प्रमुख व कीर्तिवान महाराष्ट्रीयांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत आणि दिल्लींतील निवडक व्यक्तींचा परिचय करून देण्यांत आला आहे. त्यामुळें तेथील महाराष्ट्रीयांच्या उच्च कर्तबगारीची कल्पना येते. सध्याच्या मामल्यांत मागें पडण्याची भीति वाटणाऱ्या महाराष्ट्रीयांचा आत्मविश्वास वाढविण्यास प्रस्तुत विशेषांक उपयोगी पडेल.

### स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.

३१ डिसेंबर, १९५० अखेर संपलेल्या वर्षी वरील कंपनीनें ५,६४,१७८ रु. ची विक्री केली. सर्व खर्च वजा जातां परंतु घसारा न काढता कंपनीस ३०,३२२ रु. तोटा झाला. आवाक्याबाहेरील कारणांमुळें उत्पादन कमी झालें. फेब्रुवारी १९५१ मध्यें २४ तास वीज उपलब्ध झाली असून आतां उत्पादनांत योग्य वाढ होऊं शकेल. कंपनीचा माल ठिकठिकाणच्या प्रदर्शनांत ठेवण्यांत आला होता. म्हैसूर प्रदर्शनांत त्याला सुवर्णपदक मिळालें. आतां कंपनीच्या बहुतेक अडचणी दूर झाल्या असल्यानें किफायतशीर व्यवहारास प्रारंभ होईल असें दिसतें. कंपनीचें वसूल भांडवल १२ लक्ष रु., कर्जे ८ लक्ष रु., मुदती ठेवी १ लक्ष रु., बँक ओव्हरड्राफ्ट १½ लक्ष रु., इत्यादि देणें बाजूस आकडे असून जिंदगीचे बाजूस जमीन १ लक्ष रु., फॅक्टरी बिल्डिंग ५½ लक्ष रु., मशिनरी ६½ लक्ष रु., गुडविल २ लक्ष रु., असे प्रमुख आंकडे आहेत. ताळेबंद २८ लक्ष रुपयांचा आहे. ( चेअरमन : एस. एल. किर्लोस्कर. मॅ. एजंटस : मेसर्स वैद्य ब्रदर्स अँड कं. वार्षिक सभा : १६–९–५१ ).

### पंचवार्षिक योजनेंत चित्रपट-धंद्यास स्थान नाहीं

हिंदी चित्रपट धंद्यास पंचवार्षिक योजनेंत स्थान न मिळाल्याबद्दल दिग्दर्शक देवकी बोस ह्यांनीं मद्रास येथील सिने-टेक्निशिअन्स परिषदेंत खेद व्यक्त केला.

**विमान-प्रवासाचे दर वाढणार**—इंटर नॅशनल एअर ट्रॅन्स्पोर्ट असोसिएशननें माल-वाहातुकीचे आणि प्रवासाचे दर वाढविण्याचें ठरविलें आहे. ह्या नवीन दरांना संबंधित सरकारांची मान्यता मिळाल्यास ता. १ ऑक्टोबरपासून दोन्ही दर वाढण्याचा संभव आहे असें समजतें. हे दर दोन खंडांच्या दरम्यान प्रवास करणाऱ्या विमानांचेच तेवढे वाढतील.

**सेवानिवृत्त बडे अधिकारी**—सेक्रेटरी ऑफ स्टेटसूच्या नौकरींत असलेले नौकर आणि हायकोर्ट जजेस ह्यांच्यापैकीं जे अधिकारी सेवानिवृत्त झाल्यावर कायमचे भारताबाहेर राहतील त्यांच्या पेन्शनवर प्राप्तीचा कर न घेण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे.


स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व वाशीं.

ता. ३०–६–५१ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४३,७६० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,६५,००० |
| ठेवी | रु. | ६७,१९,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७९,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. १–८–० | रु. १–१२–० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १–०–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

दि

## युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६० लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

ईश्वरीप्रसाद गोएंका, व्हाइस चेअरमन — रमणलाल जी. सरय्या, व्हाइस चेअरमन

अनंत चरण लॉ — महादेव एल. डहाणूकर

बैजनाथ जालन — मदनमोहन आर. रुइया

गोविंदलाल बंगूर — मोहनलाल एल. शहा

पी. डी. हिमतसिंगका — मोतीलाल तापुरिया

रामेश्वरलाल नोपानी — नवीनचंद्र मफतलाल

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १२ सप्टेंबर, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आशियांतील आर्थिक परिस्थिति सुधारली, तरी गंभीरच !

युनायटेड नेशन्स इकॉनॉमिक कमिशन फॉर एशिआ अँड दि फार ईस्ट (ECAFE) नें आपला "आशिया व अतिपूर्वेकडील प्रदेश ह्यांचा आर्थिक आढावा, १९५०" हा अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. डॉ. पी. एस. लोकनाथन् हे 'एकाफे' चे एक्झिक्यूटिव्ह सेक्रेटरी असून त्यांनीं प्रस्तुत ५५० पानी अहवालांत आशियाच्या आर्थिक परिस्थितीचें गांभीर्य तपशीलवार सांगितलें आहे. सप्टेंबर १९४९ मध्यें स्टर्लिंग पौंडाचें अवमूल्यन झालें, तेव्हांपासून ह्या प्रदेशाच्या परराष्ट्रीय व्यापारांत वाढावा दिसूं लागला आणि ह्या प्रवृत्तीस कोरियन युद्ध व शस्त्रास्त्रवाढ ह्यामुळें जोराची चालना मिळाली. बहुतेक सर्व देशांच्या परराष्ट्रीय व्यापारांतील तुटीचें वाढाव्यांत रूपांतर झालें. मलाया व इंडोनेशिया ह्यांच्या रबर व टिन ह्या मालास चांगलीच तेजी येऊन त्या देशांचा सर्वांत ज्यास्त फायदा झाला व होत आहे, तर भारत व बर्मा ह्या देशांचा सर्वांत कमी फायदा झाला. सर्वांची मिळून (त्यांत चीन, ब्रिटिश बोर्निओ, नेपाळ व कोरिया ह्यांचा समावेश नाहीं) निर्गत १९४९ चे मानानें २१% वाढली आणि आयात १२% कमी झाली. अमेरिकन मालाची आयात ३५% कमी झाली. ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे १९५० सालीं ८४·७ कोटी डॉलर्सचा निर्गत वाढावा उरला; १९४९ मध्यें निर्गतीपेक्षां आयात ८० कोटी डॉलर्सनीं ज्यास्त होती. दुसऱ्या महायुद्धानंतर आयातीपेक्षा निर्गत कमी झाली, असें १९५० हें पहिलेंच वर्ष होय. ही परिस्थिति टिकाऊ स्वरुपाची नाहीं, ही गोष्ट मात्र चिंताजनक आहे. आशियांतील देशांत चलनाची अवास्तव वाढ पुन: होऊं लागली आहे ती आवाक्यांत राहिली नाहीं तर पुन: अनवस्था प्रसंग आल्याविना रहाणार नाहीं.

आशियांतील देशामधील लोकांच्या वाट्यास दरमाणशीं १९४९ मध्यें जेवढें अन्न येत असे, त्या मानानें १९५० सालीं थोडेंसें ज्यास्तच आलें. युद्धपूर्व काळापेक्षा अद्याप कमी पुरवठा असला, तरी १९५० सालीं १९४९ चे मानानें अन्नाच्या 'कॅलरी' सरासरीनें अधिक मिळूं शकल्या. जमिनीच्या मालकी हक्काबाबत सुधारणा घडवून आणून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति सुधारण्याचे प्रयत्न सर्व देशांत चालू आहेत. शेतीविषयक धोरणें अधिक निश्चित झालीं आहेत आणि शेतीच्या उत्पादन वाढीच्या प्रश्नास अग्रस्थान दिलें जात आहे. तथापि, शेतीचें उत्पादन युद्धपूर्व कालापेक्षा कमीच आहे आणि तें वाढविण्यासाठी परिणामकारक उपाययोजना तातडीनें होणें अत्यावश्यक आहे. लोकसंख्या वाढत आहे, तिचे प्रमाणांत उपलब्ध साधनांचा उपयोग केला गेला पाहिजे; लोकसंख्येचा बिकट प्रश्न तटस्थपणा स्वीकारून सुटणें अशक्य आहे. आर्थिक सुधारणा, सामाजिक व सांस्कृतिक जीवन आणि लोकसंख्येची वाढ ह्यांच्या परस्पर संबंधांचा अभ्यास अधिक काळजीपूर्वक होऊं लागला आहे, हें एक आशादायक चिन्ह समजलें पाहिजे.

औद्योगिक व खाणींचें उत्पादन सर्वच देशांत हळुहळु वाढत चाललें आहे; पण भारतांतील ताग व कपास, कापड ह्यांचें उत्पादन मात्र त्यास अपवाद आहे. विजेच्या उत्पादनांत सर्वच देशांनीं प्रगति केली आहे. १९३८ चे मानानें १९५० सालीं फिलिपाइन्समधील वीज-उत्पादन दुप्पट झालें. भारतांतील तत्सम वाढ १०२%, सिलोनमधील १६१%, थायलंडमधील ५६% व जपानमधील ५७% आहे. वहातुकीच्या सोईंतहि महत्त्वाची भरपेंडली आहे. सर्व देशांच्या युद्धोत्तर योजनांत वाहातुकीच्या साधनांचे वाढीस महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें आहे. आशियांतील राष्ट्रांनीं १९४९ व १९५० ह्या सालीं यंत्रसामुग्रीची आयात केली, त्यापैकीं निम्मी आयात वहातुकीच्या सामुग्रीची होती. युनायटेड नेशन्सच्या विविध संस्था, अमेरिका, ब्रिटिश साम्राज्यांतील देश, इत्यादींनीं आशियांतील देशांना जी महत्त्वाची मदत केली ती गरजेच्या मानानें अत्यंत अपुरी असली तरी स्थानिक प्रयत्नांस चालना देण्याचे दृष्टीनें ती महत्त्वाची ठरली, ह्यांत संशय नाहीं.

भारताची आजची परिस्थिति व त्याची पंचवार्षिक योजना ह्यांची पार्श्वभूमि वरील प्रकारची आहे. आर्थिक परिस्थितीस लागलेली घसरगुंडी थांबलेली वाटते, त्याचीं कारणें तात्कालिक स्वरुपाचीं आहेत आणि लोकसंख्येची वाढ कोणत्याहि मंद आर्थिक प्रगतीस मागें टाकण्याइतकी मोठी आहे. पंचवार्षिक योजनेंत शेतीच्या उत्पादनास दिलेलें प्राधान्य योग्यच असलें तरी औद्योगिक उत्पादनास आणखी महत्त्व यावयास हवें होतें अशी त्या योजनेवर टीका ऐकूं येते. परंतु योजनेचा मर्यादित टप्पा गांठण्यास आवश्यक तो खर्च आधीं करावा लागेल, त्याची तरतूद करणें कांहीं सोपें काम नाहीं, असा हा पेचप्रसंग आहे.

### मुंबई इलाखा व्यापारी शिंपी परिषद

वरील परिषदेचें पहिलें अधिवेशन २३ व २४ सप्टेंबर रोजीं पुणें येथें मुंबईचे सुप्रसिद्ध गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर भाऊ काशिनाथ कं. चे मालक श्री. द. न. उर्फ बाबासाहेब खांडके, बी. ए., जे. पी., ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरणार आहे. सुप्रसिद्ध सॅम्सन अँड सन्स ह्या तयार कपड्यांच्या कारखान्याचे एक मालक श्री. के. च. शामराव, बंगलोर हे परिषदेचें उद्घाटन करणार आहेत. अधिवेशनास जोडून एक प्रदर्शनहि भरविण्यांत येईल.

### कोडिकनाल वेधशाळेचा सुवर्ण महोत्सव

दक्षिण भारतांतील कोडिकनाल येथील सूर्यविज्ञान वेधशाळा जगांतील अतिशय जुन्यापैकीं एक आहे. मार्च १९५१ मध्यें या वेधशाळेनें सुरू केलेल्या खगोलविज्ञान कार्यास ५० वर्षें पूर्ण झालीं. १८ सप्टेंबरला तिचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यांत येणार आहे. याच दिवशीं या वेधशाळेंत एक आयनमंडलविषयक प्रयोगशाळा व ताराविषयक विज्ञान-विभाग सुरू करण्यांत येणार आहे.

## औद्योगिक सहकार म्हणजे काय ?

लेखक : श्री. एल्. एन्. रेणु

[प्रांतिक औद्योगिक सहकारी संघाचे ऑ. सेक्रेटरी; संपादक, सहयोग, भारत सरकारचे डेव्हलपमेंट ऑफिसर (कॉटेज इंडस्ट्रीज)]

औद्योगिक सहकार हा शब्द सरसहा उपयोगांत आणला जात आहे. मात्र याची निश्चित व्याख्या काय ही कोणीही अजून दिली नाहीं. मुंबई राज्याला ग्रामोद्योग व औद्योगिक सहकारासाठी एका वेगळ्या जॉइंट रजिस्ट्रारची नेमणूक झाली आहे. भारतांत इतरही अनेक राज्यांतून वेगवेगळे संघ व सोसायट्या आहेत व औद्योगिक सहकारी संघ असे नामाभिदानहि ते वापरतात. इंग्लंडमध्यें 'बिगर—शेतकी' सोसायट्यांना 'औद्योगिक सोसायट्या' असा शब्दप्रयोग करतात. तेथील ग्राहक संस्थांचे सभासद मुख्यतः औद्योगिक केंद्रांतील कामगारच आहेत. त्यामुळें इंग्लंडांतील सहकारावरील लेखकांनीं कित्येक वेळां अशा औद्योगिक कामगार ग्राहक सोसायट्यांनाच 'औद्योगिक सहकार' असें म्हटलें आहे व ग्राहक संस्थावरील आपल्या लेखनाला त्यांनीं औद्योगिक सहकार असें संबोधलें आहे.

हिंदुस्थानांत शेतकी व बिगर शेतकी असा फरक सोसायट्यांमध्यें केला जातो आणि ज्या सोसायट्या शेतीच्या उत्पन्नाचे पुढें माल तयार करतात त्या औद्योगिक कामाला शेती सोसायट्या याच नावाखाली ओढलें जातें. उदाहरणार्थ, कापसाच्या गांसड्या बांधणाऱ्या, सरकी काढण्याच्या गिरण्या, उसापासून गूळ व साखर बनवणें हें जे सहकारी पद्धतीवर केलं जाते त्या सोसायट्याही 'शेतकी सोसायट्यांत' मोडतात. ग्राहक सोसायट्यांनीं जर उत्पादनाचें काम हातीं घेतलें तर त्याहि औद्योगिक सहकारी संस्थांत मोडत नाहींत. रजिस्ट्रार साहेबांनीं नुकताच असाही निर्णय दिला आहे कीं मच्छेमारी सोसायट्या या 'औद्योगिक सोसायट्या' मानूं नयेत. म्हणजे फक्त बिगर शेतकी, बिगर मच्छेमार व कारागीर संस्था व मजूर सहकारी संस्थाच 'औद्योगिक' या सदराखालीं मोडतील. मुंबई सहकारी कायद्यानुसार जी सोसायटी एकत्र उत्पादन व मालविक्री करते व जे कारागीर वा मजूर स्वतःची कारागिरी व श्रम एकत्र उत्पादन करतात ती 'औद्योगिक' सहकारी सोसायटी होय. ज्या सोसायटींत उत्पादन एकत्र केलें जात नाहीं, पण खरेदीविक्री एकत्र केली जाते त्यांना 'रिसोर्स' सोसायट्या, खरेदी विक्री सोसायटी मानतात. मात्र अनुभवांतीं असें दिसतें कीं प्रत्येक सोसायटी खरेदी, विक्री व उत्पादन या वेगवेगळ्या पायऱ्या चढत वा उतरत असते. सहकारी खात्यातर्फें खरेदीविक्रीच्या जोडीला कारागिरांना धंद्यासाठीं कर्ज देणाऱ्या संस्थाही उत्पादन सोसायट्या मानल्या आहेत. कारागिरांच्या कर्ज देणाऱ्या जर केवळ उत्पादनासाठींच कारागिराला कर्ज देत असतील तर त्या 'उत्पादक' मानावयाच्या कीं नाहीं ? नुकतीच प्रांतिक औद्योगिक सहकारी संघाच्या एका सब-कमिटीची सभा रजिस्ट्रार को-ऑपरेटिव्हज् यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. त्यांत अशा औद्योगिक कारणासाठी कारागिरांच्या कर्ज देणाऱ्या संस्थांना 'औद्योगिक' सोसायट्या मानावें असें ठरविण्यांत आलें.

हा प्रश्न फार गुंतागुंतीचा आहे. समजा एक सहकारी साखर कारखाना ऊंस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांनीं काढला, मग ती 'शेतकी सहकारी' मानणार ? किंवा या सोसायटीचे [illegible] कारखान्यांत काम करणारे कामगार आहेत, मग ती "औद्योगिक सहकारी" होईल काय ? किंवा साखर लागणाऱ्या ग्राहकांनीं या कारखान्याचें सभासदत्व केलें तर ती 'ग्राहक सहकारी' होईल का ? आणि या तिन्ही प्रकारचे म्हणजे शेतकरी, कामगार व ग्राहक या सर्वांनीं एक कारखाना चालवला तर याला कोणते नामाभिदान करावयाचें ? कोणत्याही धंद्यांत या प्रकारचा प्रश्न येऊं शकेल.

---

### जर्मनीची स्पर्धा ब्रिटनला जाणवूं लागली

युरोप खंडांत जर्मनी हें राष्ट्र औद्योगिक दृष्ट्या पुढारलेलें आहे. गेल्या महायुद्धांत जर्मन उद्योगधंद्यांचा पुष्कळसा विध्वंस झाला हें खरें; पण आतां जर्मन उद्योगधंद्यांनीं पुन्हा आपला जम बसविण्याचा चंग बांधला आहे. युद्धांत पराभव झाल्यानंतर जर्मनीची चार भागांत वांटणी झाल्याचें प्रसिद्धच आहे. आतां बॉन येथें स्वतंत्र जर्मन सरकारहि अधिकारावर आहे. ह्या सरकारकडून ब्रिटनला जें पोलाद मिळावयाचें आहे त्याचा पुरवठा बराच मागें पडला आहे. जर्मनीकडून ब्रिटनला सुमारें ९०,००० टन जुनें पोलाद मिळावयाचें आहे. परंतु तसें न करतां जर्मनी आपला निर्यात व्यापार वाढवीत आहे. पश्चिम जर्मनींत युद्धापूर्वीं जेवढ्या मोटारी होत्या त्यापेक्षां १० लाख अधिक मोटारी आज आहेत. ब्रिटनला होणारा पोलादाचा पुरवठा कमी झाल्यामुळें त्या देशांतील पोलादाच्या वस्तूंच्या किंमती वाढूं लागल्या आहेत. ह्यासंबंधीं बोलतांना बॉनमधील ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं चिंता व्यक्त केली आहे. ब्रिटनला द्यावयाचें पोलाद न देतां जर्मनी आपल्या स्वतःच्या उपयोगासाठीं माल निर्माण करीत आहे अशी कुरकुर ब्रिटिश अधिकारी करीत आहेत. जर्मनीच्या सायकलींच्या धंद्याचा एक कारखानदार नुकतेंच असें म्हणाला कीं जर्मनींत इतक्या सायकली तयार झाल्या आहेत कीं त्यांचें काय करावें हेंच समजत नाहीं; युद्धापूर्वीं आम्हीं ज्या प्रमाणांत माल निर्यात करीत होतों त्या प्रमाणांत पुन्हा लवकरच निर्यात करूं लागू अशी आशा आम्हांस वाटत आहे. पोलादाबाबत जशी परिस्थिति आहे तशी कोळशाबद्दलहि उत्पन्न होऊं घातली आहे. आपल्या उपयोगासाठी आणि दोस्त राष्ट्रांच्या लष्करांचा खर्च देण्यासाठीं जर्मनी स्वतःचा कोळसा अधिक प्रमाणांत वापरत आहे. ह्यावर्षी जर्मनीकडून दोस्त राष्ट्रांना ५५ कोटी पौंड यावयाचे आहेत. परंतु प. जर्मनीचे चॅन्सेलर ॲडनौअर ह्यांनीं नुकतेच असें बोलून दाखविलें की एवढी रकम जर्मनीला देतां येणें शक्य नाहीं. ह्या गोंधळांत ब्रिटनवर लष्करीकरणाचा भार अधिकाधिक पडत आहे आणि जर्मनी मात्र आपला निर्यात व्यापार वाढवीत आहे. जर्मन उद्योगधंद्यांची ब्रिटिश उद्योगधंद्यांना होणारी ही स्पर्धा अशीच वाढत गेल्यास ब्रिटिश उद्योगधंद्यांना शस्त्रास्त्रवाढीचा कार्यक्रम फारच जाचक होण्याचा संभव आहे.

---

### दैनिक महाराष्ट्र खरीदण्यासाठी श्री शिवराज प्रकाशन लि.

"महाराष्ट्र" च्या विश्वस्तांपासून त्यांचें गेलीं अनेक वर्षें चालू असलेलें दैनिक "महाराष्ट्र" हें पत्र चालू स्थितींत खरेदी करणें, इत्यादि उद्देशांनीं श्री शिवराज प्रकाशन लि. ही कंपनी नागपूर येथें स्थापन झाली आहे. मेसर्स धनवटे, ओगले आणि कं. कडे मॅनेजिंग एजन्सी रहाणार आहे. श्री. पूर्णचंद्रराव बुटी हे अध्यक्ष आहेत. कंपनीनें २ लक्ष रुपयांचें ऑर्डिनरी भांडवल [illegible]

## कच्च्या मालाच्या किंमती आटोक्यांत राखण्याची आवश्यकता

जगांतील कच्च्या मालाच्या किंमतीचा प्रश्न सध्या फार महत्त्वाचा झाला असून १३ जुलै रोजीं पॅरिस येथें युरोपियन आर्थिक सहकार्य संघटनेच्या सभेंत ब्रिटनचे अर्थमंत्री गेटस्केल यांनीं हा प्रश्न उपस्थित केला होता. वॉशिंग्टन येथें लौकरच भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय मटीरिअल्स् कॉन्फरन्सपुढें हा प्रश्न चर्चेला येईल. कच्च्या मालाच्या वस्तूंचा पुरवठा मर्यादित आहे. परंतु कोरियन प्रकरणापासून या वस्तूंची मागणी निरनिराळया उपयोगासाठी तीव्रतेनें वाढल्यामुळें आज जागतिक बाजार पेठेंत कच्च्या मालाचा मर्यादित पुरवठा, परंतु त्याला जोरदार मागणी, अशी परिस्थिति निर्माण झाल्यामुळें कच्च्या मालाचे बाजारभाव कडाडले आहेत. कोणत्याहि वस्तूच्या किंमतीबद्दल एक गिऱ्हाइकाचा व दुसरा विक्रेत्याचा असे विरोधी हितसंबंध दिसून येतात व या दोनहि हितसंबंधांचा समन्वय साधणें कांहीं वेळां कठीण जातें. कोरियन प्रकरणापासून अशाच परिस्थिति निर्माण झाली आहे. जागतिक मालाच्या किंमतीच्या बाबतींत ब्रिटनचा परिस्थिति शक्य तितकी व्यापक आ . कारण ब्रिटन व स्टर्लिंग गट ह्यांचा कच्च्या मालाच्या पुरवठ्यापासून विशेष फायदा होतो. ब्रिटनचे हितसंबंध हे केवळ गिऱ्हाइक या नात्याचे नसतात तर बहुतेक कच्च्या मालाच्या बाबतींत पक्का माल तयार करून त्या मालाचा विक्रेता म्हणून ब्रिटनला महत्त्व आहे. रबर, टिन व लोकर यांच्या किंमती १९४९ मध्यें अमेरिकेंतील तात्पुरत्या मंदीमुळें घटूं लागल्या. परंतु तावडतोब अवमूल्यन करण्यांत आल्यामुळें स्टार्लिंग गटांतील देशांचा व्यापार पुन्हां सुधारला' व त्यानंतर कोरियन प्रकरणामुळ युद्धतयारीच्या दृष्टीनें अमेरिका इ. देश अयत्न करूं लागल्यामुळें स्टर्लिंग गटाकडे सोनें व डॉलर्स यांची आयात होऊं लागली. यावरूनहि ब्रिटनचे हितसंबंध कसे व्यापक स्वरूपाचे असतात हें स्पष्ट होतें. ब्रिटन इतका आयातीवर कोणताहि देश अवलंबून नाहीं. गंधक, रबर व कापूस यांच्या आयातीवर पूर्णपणें, पेट्रोल लोह-विरहित धातू व लोकर यांच्या आयातींवर बहुतेक प्रमाणांत, इमारती लाकडावर तीन-चतुर्थांश प्रमाणांत, लोखंडाच्या आयातीवर निम्मे प्रमाणांत' व अन्नाच्या बाबतींत निम्मेहून जास्त प्रमाणांत ब्रिटनला इतर राष्ट्रांवर अवलंबून असावें लागतें. यामुळें आयात मालाच्या किंमती भडकल्या तर त्याचा त्वरित परिणाम ब्रिटनमधील विक्रीमालावर होतो. आयात मालाच्या किंमती १९५० च्या मानानें ४० टक्के वाढल्यास आयातीवर एका वर्षांत ९० कोटी पौंड जादा खर्च करावे लागतील, परंतु जादा युद्धतयारीचा एका वर्षांतील जादा खर्च फक्त ५० कोटी पौंड होईल. या तुलानात्मक आंकड्यांवरूनें ब्रिटनच्या दृष्टीनें आयात होणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमती मर्यादित राहणें किती आवश्यक आहे याची कल्पना येईल. ब्रिटनप्रमाणेंच गेल्या एक वर्षांत बेलजम व हॉलंडमध्यें राहाणीचा खर्च १३ टक्के वाढला आहे, नॉर्वेचा १४ टक्के, स्वीडनचा १६ टक्के व फ्रान्सचा २० टक्के, इतका वाढला आहे, तेव्हां कच्च्या मालाच्या किंमती मर्यादित राखणें सर्वांच्या कसें फायद्याचें आहे हें लक्षांत येईल.


**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.** (स्थापना १९१८)

शाखा :
१ दादर
१ माहीम
१ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.

३, ५, १० वर्षें सिल्व्हर ज्युबिली सर्टिफिकिटें दर ९३-८, ८७-८, ७५ अनुक्रमें.
हेड ऑफिस-गिरगांव, मुंबई


## डायरेक्टरच्या लायकीस मुदती ठेवीची अट

### कायदेशीरपणाचा प्रश्न

( मद्रास हायकोर्टाचा निवाडा )

सरस्वती विलासम शणमुगानन्द निधि लि. च्या भागीदारांच्या सभेनें मंजूर केलेला एक ठराव बेकायदा आहे, असा निवाडा मागण्यासाठी त्या कंपनीचे एक डायरेक्टर व्ही. ए. दैवसिग्मणी मुदलियार ह्यांनीं दावा लावला होता. कंपनीच्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशनप्रमाणें डायरेक्टर होण्यासाठीं तिचे २५ शेअर्स धारण करणें आवश्यक होतें. हे शेअर्स धारण करून पुनः प्रत्येकानें कंपनींत १,००० रु. ची मुदती ठेव ठेवण्याची अट लादणारा एक ठराव कंपनीच्या विशेष साधारण सभेनें स्पेशल ठराव म्हणून पास केला होता. मुदलियार हे कंपनीचे एक डायरेक्टर होते. प्रस्तुत ठराव हा कंपनी कायद्यास धरून नाहीं आणि मेमोरँडम ऑफ असोसिएशनशींहि विसंगत आहे, असें प्रतिपादन करून ठराव बेकायदा ठरविण्याची त्यांनीं कोर्टास विनंति केली. कोर्टानें ठराव कायदेशीर ठरवला, परंतु त्याच्या वरिष्ठ कोर्टानें ( सबॉर्डिनेट जज्जानें ) ठराव बेकायदा असल्याचें सांगितलें. मद्रास हायकोर्टाकडे कंपनीनें अपील केलें. हायकोर्टानें पहिल्या कोर्टाचा निवाडाच कायम करून सबॉर्डिनेट जज्जाचा निवाडा फिरविला. हायकोर्टाचा निवाडा खाली दिला आहे:—

" डायरेक्टरानें कांहीं शेअर्स धारण केलेच पाहिजेत, असें कंपनी कायदा सांगत नाहीं. एकहि शेअर धारण न करणारे एक्स-ऑफिशिओ डायरेक्टर्सहि कायद्यास संमत आहेत. शेअर धारण करण्याव्यतिरिक्त दुसरी एखादी लायकीहि डायरेक्टर होण्यासाठीं आवश्यक ठरविण्याचा कंपनीच्या भागीदारांना अधिकार आहे. उदाहरणार्थ, डायरेक्टर होणाऱ्यांच्या अनुभवी मार्गदर्शनाबद्दल विश्वास वाटावा ह्यासाठीं त्यांचें किमान कांहींतरी वय असलेंच पाहिजे, असें भागीदारांनीं ठरविलें, तर त्यांत वावगें कांहींच नाहीं. त्याचप्रमाणें, कंपनीच्या कामासाठीं जरूर असेल, तर डायरेक्टरांसाठीं तांत्रिक लायकीहि आवश्यक ठरवितां येईल. भागीदारांच्या विचाराचा व निर्णयाचा हा प्रश्न आहे. डायरेक्टरांनीं लायकीची जादा अट म्हणून प्रस्तुत कंपनींत १,००० रु. ची मुदती ठेव ठेवावी, असें बंधन घालणारा स्पेशल ठराव कंपनीच्या अधिकारांत असून पूर्णपणें कायदेशीर आहे." जे डायरेक्टर म्हणून आज काम करीत आहेत, त्यांनाहि हा ठराव बंधनकारक होतो असें पहिल्या कोर्टानें सांगितलें होतें. परंतु हायकोर्टांतील अपिलाच्या वेळीं मुदलियारांची डायरेक्टरशिपची मुदत संपली असल्याकारणानें दुरुस्त आर्टिकलप्रमाणेंच लायकी असल्याविना त्यांना फेरनिवडणुकीस उभें राहातां येणें अशक्य झालें होतें. तेव्हां, चालू डायरेक्टरांवर दुरुस्तीचा काय परिणाम होतो, ह्याचा विचार करण्याची हायकोर्टास आवश्यकता वाटली नाहीं.

## औद्योगिक सहकार म्हणजे काय ?

लेखक : श्री. एल्. एन्. रेणु

[प्रांतिक औद्योगिक सहकारी संघाचे ऑ. सेक्रेटरी; संपादक, सहयोग, भारत सरकारचे डेव्हलपमेंट ऑफिसर (कॉटेज इंडस्ट्रीज)]

औद्योगिक सहकार हा शब्द सरसहा उपयोगांत आणला जात आहे. मात्र याची निश्चित व्याख्या काय हीं कोणीही अजून दिली नाहीं. मुंबई राज्याला ग्रामोद्योग व औद्योगिक सहकारासाठी एका वेगळया जॉइंट रजिस्ट्रारची नेमणूक झाली आहे. भारतात इतरही अनेक राज्यांतून वेगवेगळे संघ व सोसायटया आहेत व औद्योगिक सहकारी संघ असें नामाभिधानहि ते वापरतात. इंग्लंडमध्यें 'बिगर–शेतकी' सोसायटयांना 'औद्योगिक सोसायटया' असा शब्दप्रयोग करतात. तेथील ग्राहक संस्थांचे समासद मुख्यतः औद्योगिक केंद्रांतील कामगारच आहेत. त्यामुळें इंग्लंडांतील सहकारावरील लेखकांनीं कित्येक वेळां अशा औद्योगिक कामगार ग्राहक सोसायटयांनाच 'औद्योगिक सहकार' असें म्हटलें आहे व ग्राहक संस्थांवरील आपल्या लेखनाला त्यांनीं औद्योगिक सहकार असें संबोधलें आहे.

हिंदुस्थानांत शेतकी व बिगर शेतकी असा फरक सोसायटयांमध्यें केला जातो आणि ज्या सोसायटया शेतीच्या उत्पन्नाचे पुढें माल तयार करतात त्या औद्योगिक कामाला शेती सोसायटया याच नावाखालीं ओढलें जातें. उदाहरणार्थ, कापसाच्या गांसड्या बांधणाऱ्या, सरकी काढण्याच्या गिरण्या, उसापासून गूळ व साखर बनवणें हें जे सहकारी पद्धतीवर केलें जातें त्या सोसायटयाही 'शेतकी सोसायटयांत' मोडतात. ग्राहक सोसायटयांनीं जर उत्पादनाचें काम हातीं घेतलें तर त्याहि औद्योगिक सहकारी संस्थांत मोडत नाहींत. रजिस्ट्रार साहेबांनीं नुकताच असाही निर्णय दिला आहे कीं मच्छेमारी सोसायटया या 'औद्योगिक सोसायटया' मानूं नयेत. म्हणजे फक्त बिगर शेतकी, बिगर मच्छेमार व कारागीर संस्था व मजूर सहकारी संस्थाच 'औद्योगिक' या सदराखालीं मोडतील. मुंबई सहकारी कायद्यानुसार जी सोसायटी एकत्र उत्पादन व मालविक्री करते व जे कारागीर वा मजूर स्वतःची कारागिरी व श्रम एकत्र उत्पादन करतात ती 'औद्योगिक' सहकारी सोसायटी होय. ज्या सोसायटींत उत्पादन एकत्र केलें जात नाहीं, पण खरेदीविक्री एकत्र केली जाते त्यांना 'रिसोर्स' सोसायटया, खरेदी विक्री सोसायटी मानतात. मात्र अनुभवांतीं असें दिसतें कीं प्रत्येक सोसायटी खरेदी, विक्री व उत्पादन या वेगवेगळया पायऱ्या चढत वा उतरत असते. सहकारी खात्यातर्फे खरेदीविक्रीच्या जोडीला कारागिरांना धंद्यासाठीं कर्ज देणाऱ्या संस्थाही उत्पादन सोसायटया मानल्या आहेत. कारागिरांच्या कर्ज देणाऱ्या जर केवळ उत्पादनासाठींच कारागिराला कर्ज देत असतील तर त्या 'उत्पादक' मानावयाच्या कीं नाहीं ? नुकतीच प्रांतिक औद्योगिक सहकारी संघाच्या एका सब-कमिटीची सभा रजिस्ट्रार को-ऑपरेटिव्हज् यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. त्यांत अशा औद्योगिक कारणासाठीं कारागिरांच्या कर्ज देणाऱ्या संस्थांना 'औद्योगिक' सोसायटया मानावें असें ठरविण्यांत आलें.

हा प्रश्न फार गुंतागुंतीचा आहे. समजा एक सहकारी साखर कारखाना ऊंस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांनीं काढला, मग ती 'शेतकी सहकारी' मानणार ? किंवा या सोसायटीचे सभासद त्या कारखान्यांत काम करणारे कामगार आहेत, मग ती "औद्योगिक सहकारी" होईल काय ? किंवा साखर लागणाऱ्या ग्राहकांनीं या कारखान्याचें सभासदत्व केलें तर ती 'ग्राहक सहकारी' होईल का ? आणि या तिन्ही प्रकारचे म्हणजे शेतकरी, कामगार व ग्राहक या सर्वांनीं एक कारखाना चालवला तर याला कोणते नामाभिदान करावयाचें ? कोणत्याही धंद्यांत या प्रकारचा प्रश्न येऊं शकेल.

---

### जर्मनीची स्पर्धा ब्रिटनला जाणवूं लागली

युरोप खंडांत जर्मनी हें राष्ट्र औद्योगिक दृष्टया पुढारलेलें आहे. गेल्या महायुद्धांत जर्मन उद्योगधंद्यांचा पुष्कळसा विध्वंस झाला हें खरें; पण आतां जर्मन उद्योगधंद्यांनीं पुन्हा आपला जम बसविण्याचा चंग बांधला आहे. युद्धांत पराभव झाल्यानंतर जर्मनीची चार भागांत वांटणी झाल्याचें प्रसिद्धच आहे. आतां बॉन येथें स्वतंत्र, जर्मन सरकारहि अधिकारावर आहे. ह्या सरकारकडून ब्रिटनला जें पोलाद मिळावयाचें आहे त्याचा पुरवठा बराच मागें पडला आहे. जर्मनीकडून ब्रिटनला सुमारें ९०,००० टन जुनें पोलाद मिळावयाचें आहे. परंतु तसें न करतां जर्मनी आपला निर्यात व्यापार वाढवीत आहे. पश्चिम जर्मनींत युद्धापूर्वीं जेवढ्या मोटारी होत्या त्यापेक्षां १० लाख अधिक मोटारी आज आहेत. ब्रिटनला होणारा पोलादाचा पुरवठा कमी झाल्यामुळें त्या देशांतील पोलादाच्या वस्तूंच्या किंमती वाढूं लागल्या आहेत. ह्यासंबंधीं बोलतांना बॉनमधील ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं चिंता व्यक्त केली आहे. ब्रिटनला द्यावयाचें पोलाद न देतां जर्मनी आपल्या स्वतःच्या उपयोगासाठीं माल निर्माण करीत आहे अशी कुरकुर ब्रिटिश अधिकारी करीत आहेत. जर्मनीच्या सायकलीच्या धंद्याचा एक कारखानदार नुकतेंच असें म्हणाला कीं जर्मनींत इतक्या सायकली तयार झाल्या आहेत कीं त्यांचें काय करावें हेंच समजत नाहीं; युद्धापूर्वीं आम्हीं ज्या प्रमाणांत माल निर्यात करीत होतों त्या प्रमाणांत पुन्हा लवकरच निर्यात करूं लागूं अशी आशा आम्हांस वाटत आहे. पोलादाबाबत जशी परिस्थिति आहे तशी कोळशाबद्दलहि उत्पन्न होऊं घातली आहे. आपल्या उपयोगासाठीं आणि दोस्त राष्ट्रांच्या लष्करांचा खर्च देण्यासाठीं जर्मनी स्वतःचा कोळसा अधिक प्रमाणांत वापरत आहे. ह्यावर्षी जर्मनीकडून दोस्त राष्ट्रांना ५५ कोटी पौंड द्यावयाचे आहेत. परंतु प. जर्मनीचे चॅन्सेलर ॲडनौअर ह्यांनीं नुकतेंच असें बोलून दाखविलें कीं एवढी रक्कम जर्मनीला देतां येणें शक्य नाहीं. ह्या गोंधळांत ब्रिटनवर लष्करीकरणाचा भार अधिकाधिक पडत आहे आणि जर्मनी मात्र आपला निर्यात व्यापार वाढवीत आहे. जर्मन उद्योगधंद्यांची ब्रिटिश उद्योगधंद्यांना होणारी ही स्पर्धा अशीच वाढत गेल्यास ब्रिटिश उद्योगधंद्यांना शस्त्रास्त्रवाढीचा कार्यक्रम फारच जाचक होण्याचा संभव आहे.

---

### दैनिक महाराष्ट्र खरीदण्यासाठीं श्री शिवराज प्रकाशन लि.

"महाराष्ट्र" च्या विश्वस्तांपासून त्यांचें गेलीं अनेक वर्षे चालू असलेलें दैनिक "महाराष्ट्र" हें पत्र चालू स्थितींत खरेदी करणें, इत्यादि उद्देशांनीं श्री शिवराज प्रकाशन लि. ही कंपनी नागपूर येथें स्थापन झाली आहे. मेसर्स घनवटे, ओगले आणि कं. कडे मॅनेजिंग एजन्सी रहाणार आहे. श्री. पूर्णचंद्रराव बुटी हे अध्यक्ष आहेत. कंपनीनें २ लक्ष रुपयांचे ऑर्डिनरी भांडवल विक्रीस काढलें आहे.

## कच्च्या मालाच्या किंमती आटोक्यांत राखण्याची आवश्यकता

जगांतील कच्च्या मालाच्या किंमतीचा प्रश्न सध्या फार महत्त्वाचा झाला असून १३ जुलै रोजीं पॅरिस येथें युरोपियन आर्थिक सहकार्य संघटनेच्या सभेत ब्रिटनचे अर्थमंत्री गेटस्केल यांनीं हा प्रश्न उपस्थित केला होता. वॉशिंग्टन येथें लौकरच भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय मटीरिअल्स् कॉन्फरन्सपुढें हा प्रश्न चर्चेला येईल. कच्च्या मालाच्या वस्तूंचा पुरवठा मर्यादित आहे. परंतु कोरियन प्रकरणापासून या वस्तूंची मागणी निरनिराळ्या उपयोगासाठीं तीव्रतेनें वाढल्यामुळें आज जागतिक बाजार पेठेंत कच्च्या मालाचा मर्यादित पुरवठा, परंतु त्याला जोरदार मागणी, अशी परिस्थिति निर्माण झाल्यामुळें कच्च्या मालाचे बाजारभाव कडाडले आहेत. कोणत्याहि वस्तूच्या किंमतीबद्दल एक गिऱ्हाइकाचा व दुसरा विक्रेत्याचा असे विरोधी हितसंबंध दिसून येतात व या दोनहि हितसंबंधांचा समन्वय साधणें कांहीं वेळां कठीण जातें. कोरियन प्रकरणापासून अशाच परिस्थिति निर्माण झाली आहे. जागतिक मालाच्या किंमतीच्या बाबतींत ब्रिटनचा परिस्थिति शक्य तितकी व्यापक आहे. कारण ब्रिटन व स्टर्लिंग गट ह्यांचा कच्च्या मालाच्या पुरवठ्यापासून विशेष फायदा होतो. ब्रिटनचे हितसंबंध हे केवळ गिऱ्हाइक या नात्याचे नसतात तर बहुतेक कच्च्या मालाच्या बाबतींत पक्का माल तयार करून त्या मालाचा विक्रेता म्हणून ब्रिटनला महत्त्व आहे. रबर, टिन व लोंकर यांच्या किंमती १९४९ मध्यें अमेरिकेंतील तात्पुरत्या मंदीमुळें घटूं लागल्या. परंतु ताबडतोब अवमूल्यन करण्यांत आल्यामुळें स्टर्लिंग गटांतील देशांचा व्यापार पुन्हां सुधारला व त्यानंतर कोरियन प्रकरणामुळ युद्धतयारीच्या दृष्टीनें अमेरिका इ. देश प्रयत्न करूं लागल्यामुळें स्टर्लिंग गटाकडे सोनें व डॉलर्स यांची आयात होऊं लागली. यावरूनहि ब्रिटनचे हितसंबंध कसे व्यापक स्वरूपाचे असतात हें स्पष्ट होतें. ब्रिटन इतका आयातीवर कोणताहि देश अवलंबून नाहीं. गंधक, रबर व कापूस यांच्या आयातीवर पूर्णपणें, पेट्रोल लोह-विरहित धातू व लोंकर यांच्या आयातीवर बहुतेक प्रमाणांत, इमारती लाकडावर तीन-चतुर्थांश प्रमाणांत, लोखंडाच्या आयातीवर निम्मे प्रमाणांत व अन्नाच्या बाबतींत निम्मेहून जास्त प्रमाणांत ब्रिटनला इतर राष्ट्रांवर अवलंबून असावें लागतें. यामुळें आयात मालाच्या किंमती भडकल्या तर त्याचा त्वरित परिणाम ब्रिटनमधील विक्रीमालावर होतो. आयात मालाच्या किंमती १९५० च्या मानानें ४० टक्के वाढल्यास आयातीवर एका वर्षांत ९० कोटी पौंड जादा खर्च करावे लागतील, परंतु जादा युद्धतयारीचा एका वर्षांतील जादा खर्च फक्त ५० कोटी पौंड होईल. या तुलानात्मक आंकड्यांवरून ब्रिटनच्या दृष्टीनें आयात होणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमती मर्यादित राहणें किती आवश्यक आहे याची कल्पना येईल. ब्रिटनप्रमाणेंच गेल्या एक वर्षांत बेलजम व हॉलंडमध्यें राहाणीचा खर्च १३ टक्के वाढला आहे, नॉर्वेचा १४ टक्के, स्वीडनचा १६ टक्के व फ्रान्सचा २० टक्के, इतका वाढला आहे, तेव्हां कच्च्या मालाच्या किंमती मर्यादित राखणें सर्वांच्या कसें फायद्याचें आहे हें लक्षांत येईल.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
३, ५, १० वर्षे सिल्व्हर ज्युबिली सर्टिफिकिटें
दर ९३-८, ८७-८, ७५ अनुक्रमें.
हेड ऑफिस—गिरगांव, मुंबई

## डायरेक्टरच्या लायकीस मुदती ठेवीची अट

### कायदेशीरपणाचा प्रश्न

### ( मद्रास हायकोर्टाचा निवाडा )

सरस्वती विलासम शण्मुगानन्द निधि लि. च्या भागीदारांच्या सभेनें मंजूर केलेला एक ठराव बेकायदा आहे, असा निवाडा मागण्यासाठीं त्या कंपनीचे एक डायरेक्टर व्ही. ए. दैवसिगमणी मुदलियार ह्यांनीं दावा लावला होता. कंपनीच्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशनप्रमाणें डायरेक्टर होण्यासाठीं तिचे २५ शेअर्स धारण करणें आवश्यक होतें. हे शेअर्स धारण करून पुनः प्रत्येकानें कंपनींत १,००० रु. ची मुदती ठेव ठेवण्याची अट लादणारा एक ठराव कंपनीच्या विशेष साधारण सभेनें स्पेशल ठराव म्हणून पास केला होता. मुदलियार हे कंपनीचे एक डायरेक्टर होते. प्रस्तुत ठराव हा कंपनी कायद्यास धरून नाहीं आणि मेमोरँडम ऑफ असोसिएशनशींहि विसंगत आहे, असें प्रतिपादन करून ठराव बेकायदा ठरविण्याची त्यांनीं कोर्टास विनंति केली. कोर्टानें ठराव कायदेशीर ठरवला, परंतु त्याच्या वरिष्ठ कोर्टानें ( सबॉर्डिनेट जज्जानें ) ठराव बेकायदा असल्याचें सांगितलें. मद्रास हायकोर्टाकडे कंपनीनें अपील केलें. हायकोर्टानें पहिल्या कोर्टाचा निवाडाच कायम करून सबॉर्डिनेट जज्जाचा निवाडा फिरविला. हायकोर्टाचा निवाडा खाली दिला आहे:—

“ डायरेक्टरानें कांहीं शेअर्स धारण केलेच पाहिजेत, असें कंपनी कायदा सांगीत नाहीं. एकहि शेअर धारण न करणारे एक्स-ऑफिशिओ डायरेक्टर्सहि कायद्यास संमत आहेत. शेअर धारण करण्याव्यतिरिक्त दुसरी एकादी लायकीहि डायरेक्टर होण्यासाठीं आवश्यक ठरविण्याचा कंपनीच्या भागीदारांना अधिकार आहे. उदाहरणार्थ, डायरेक्टर होणाऱ्यांच्या अनुभवी मार्गदर्शनाबद्दल विश्वास वाटावा ह्यासाठीं त्यांचें किमान कांहींतरी वय असलेंच पाहिजे, असें भागीदारांनीं ठरविलें, तर त्यांत वावगें कांहींच नाहीं. त्याचप्रमाणें, कंपनीच्या कामासाठीं जरूर असेल, तर डायरेक्टरांसाठीं तांत्रिक लायकीहि आवश्यक ठरवितां येईल. भागीदारांच्या विचाराचा व निर्णयाचा हा प्रश्न आहे. डायरेक्टरांनीं लायकीची जादा अट म्हणून प्रस्तुत कंपनींत १,००० रु. ची मुदती ठेव ठेवावी, असें बंधन घालणारा स्पेशल ठराव कंपनीच्या अधिकारांत असून पूर्णपणें कायदेशीर आहे. ” जे डायरेक्टर म्हणून आज काम करीत आहेत, त्यांनाहि हा ठराव बंधनकारक होतो असें पहिल्या कोर्टानें सांगितलें होतें. परंतु हायकोर्टांतील अपिलाच्या वेळीं मुदलियारांची डायरेक्टरशिपची मुदत संपली असल्याकारणानें दुरुस्त आर्टिकलसप्रमाणेंच लायकी असल्याविना त्यांना फेरनिवडणुकीस उभें राहातां येणें अशक्य झालें होतें. तेव्हां, चालू डायरेक्टरांवर दुरुस्तीचा काय परिणाम होतो, ह्याचा विचार करण्याची हायकोर्टास आवश्यकता वाटली नाहीं.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

फोन नं. १४८३ | तारेचा पत्ता "Cencobank" | पोस्टबॉक्स नं. ५११

मुख्य कचेरी—लक्ष्मी रोड, पुणें शहर.
शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा, मंचर, भोर पौड व वडगांव (मावळ)

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—
जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रबडे
मॅनेजिंग डायरेक्टर



फोनः ३५५११ तारः SAHYOG

# दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या (प्रोड्यूसर्स) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड (सुती व लोकरी), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, साय तेलें, लांकूड आणि कोळसा वगैरे.



# दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—यथायत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली चेअरमन
श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. COM., C. A. I. I. B.
मॅनेजर



# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई.
स्थापन साल १९११

चेअरमनः—श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. ४८,२६,००० |
| गंगाजळी फंड | रु. ३३,४१,००० |
| ठेवी | रु. ८,६९,९७,००० |
| खेळतें भांडवल | रु. १०,४३,९३,००० |

## १५ जिल्ह्यांत ६५ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## जलवाहातुकीचा धंदा, सरकारी धोरण व नियोजन मंडळाची योजना

( भा. म. काळे )

किनाऱ्यावरची जलवाहातुक हिंदी जहाजांसाठीच पूर्णपणें राखून ठेवली जाईल व या धोरणाची पूर्णावस्था १५ ऑगस्ट १९५१ पर्यंत गांठली जाईल अशा आशयाची प्रेसनोट हिंद-सरकारनें तिसऱ्या स्वातंत्र्य दिनाच्या वेळीं म्हणजे १५ ऑगस्ट १९५० रोजीं काढली. या प्रेसनोटचें हिंदी जहाज: वाहातुक कंपन्यांनीं स्वागत केलें व १९९९ पासून मि. हाजी यांच्या किनाऱ्यावरील वाहातुक हिंदी जहाजांसाठीं राखून ठेवण्यांत यावी अशी मागणी करणाऱ्या मध्यवर्ती कायदेमंडळापुढें मांडण्यांत आलेल्या ठरावाच्या वेळेपासूनच्या प्रयत्नांना, शेवटीं स्वातंत्र्याच्या काळांत यश आलें यावद्दल सर्वांनाच समाधान वाटलें. ऑक्टोबर १९५० च्या सुमारास नोंदविलेल्या ब्रिटिश जहाजांचं टनेज ४ लक्ष, ७० हजार होतें तें अगदीं अलिकडे फक्त ४९ हजार एवढेंच उरलें आहे. अजून सात ब्रिटिश जहाजें किनाऱ्यावर वाहतुक करीत आहेत. परंतु लौकरच किनाऱ्यावरील वाहतुक पूर्णपणें देशी जहाजांच्या हातीं येईल. सरकारी धोरण याला पूर्ण अनुकूल आहे एवढेंच नव्हे तर अलिकडे सरकारनें विजगापट्टमच्या गोदींत बांधल्या जाणाऱ्या शिंदा कंपनीच्या बोटींना बाउंटी देऊन प्रत्यक्ष मदतहि केली आहे. याशिवाय नियोजन मंडळाच्या पंचवार्षिक योजनेनुसार सरकार किनाऱ्यावरील वाहातुकीसाठी आगबोटी सुमारें ८० हजार टनांच्या खरेदी करण्यासाठीं ४ कोटी रुपये कर्ज देणार आहे, व परदेशांशीं जलवाहातुक करण्यासाठीं सव्वा लक्ष टन वजनाच्या बोटींच्या खरेदीसाठी आणखी ६॥ कोटी रुपये कर्ज देणार आहे. याशिवाय दूर देशच्या वाहातुकीसाठी ईस्टर्न शिपिंग कॉर्पोरेशनमध्यें सरकार स्वतः ४॥ कोटी रुपये गुंतविणार आहे. याप्रमाणें पंचवार्षिक योजनेंतील आवश्यक अशा पहिल्या भागांतच जल वाहातुक धंद्यासाठी १४ कोटी, ९० लक्ष रुपये भांडवली खर्चाची तरतूद करण्यांत आली आहे. याशिवाय विजगापट्टम येथील जहाजें बांधण्याच्या कारखान्याला मदत व नौदलामधील जहाजांची संख्या वाढविण्यासाठी पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या भागांत आणखी १२ कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यांत आली आहे. नियोजन मंडळाच्या दुसऱ्या भागांत १० कोटी रुपये रकमेची तरतूद हिंदी जहाजांचे टनेज वाढविण्यासाठी करण्यांत आली आहे. मरीन इंजिनियरिंग व व्यापारी जहाजांसाठी आवश्यक शिक्षणाचीहि सोय करण्यांत येणार आहे.

सध्यां हिंदच्या मालकीच्या जहाजांचें टनेज सुमारें ३ लक्ष, ५० हजार असून, त्यापैकीं सुमारें दोन लक्ष टनांचीं जहाजें किनाऱ्यावरील वाहातुक करतात व बाकीचीं दूरच्या देशांशीं वाहातुक करतात. सरकारी धोरणाप्रमाणें १५ ऑगस्ट, १९५१ पासून किनाऱ्यावरील जलवाहातुक पूर्णपणें देशी जहाजांच्या हातीं येण्यासाठी व नजिकच्या देशांशीं थोडासा व्यापार करतां येण्यासाठीं हिंदी जहाज-कंपन्यांना सरकारनें निदान २० कोटी रुपये अल्पदरानें मुदतीचें कर्ज म्हणून यावें अशी मागणी फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स व इंडस्ट्रीच्या मार्च अखेर झालेल्या दिल्ली येथील अधिवेशनांत करण्यांत आली होती. या ठरावावर विळीं जलवाहातुक धंद्यांतील तज्ज्ञांचीं माहितीपूर्ण भाषणें झालीं होतीं. नियोजन मंडळाच्या योजनेंत जलवाहातुक धंद्याच्या मुख्य मागण्या कांहीं प्रमाणांत पूर्ण करण्यांत आल्या आहेत असें दिसतें.

१९४७ पासून हिंद सरकारचें जलवाहातुक धंद्याबद्दलचें धोरण समाधानकारक आहे. सुरवातीलाच सरकारनें किनाऱ्यावर वाहातुक करणाऱ्या आगबोटींना लायसेन्स देण्याची पद्धति सुरू केली. याचा हिंदी जहाज-धंद्यावर अनुकूल परिणाम झाला. नंतर सरकारनें डायरेक्टर जनरल ऑफ शिपिंग ही जागा १९४९ मध्यें निर्माण केली, व किनाऱ्यावरील बंदराच्या विकास योजनेचा प्रश्न हातीं घेतला. १५ ऑगस्ट, १९५० च्या प्रेसनोटनें किनाऱ्यावरील जलवाहातुक १५ ऑगस्ट, १९५१ पासून हिंदी जहाजांसाठीच राखून ठेवली. भरपूर सरकारी मदतीशिवाय कोणत्याहि पाश्चिमात्य देशांत जलवाहातुकीचा धंदा स्थिरस्थावर होऊं शकलेला नाहीं. तेव्हां सरकारनें बाउंटी, अल्प व्याजाचीं कर्जे, किनाऱ्यावरील जलवाहातुक देशी जहाजांसाठी राखून ठेवणें, करविषयक सवलती, इ. शक्य त्या मार्गांनीं या धंद्याला मदत करावी, असें जलवाहातुक कंपन्यांचें म्हणणें आहे. सरकारी धोरणामुळें व नियोजन मंडळाच्या योजनेमुळें या बहुतेक सर्व मागण्या पूर्ण होतील असें दिसत आहे. जागतिक लोकसंख्येच्या सुमारें १६ ते १७ टक्के हिंदची लोकसंख्या आहे. जगाच्या पर-राष्ट्रीय व्यापारांत हिंदचा वांटा ४ टक्के आहे. परंतु हिंदच्या मालकीचीं जहाजें फक्त अर्ध्या टक्क्याहूनहि किंचित् कमी आहेत. या तुलनात्मक आंकड्यांवरून जलवाहातुक व जहाजें बांधणें या धंद्यांत किती प्रचंड प्रगति केली पाहिजे, याची कल्पना येईल.

---


धी बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

### जाहीर खबर

जाहीर करण्यांत येतें कीं ह्या बँकेची ४० वी वार्षिक साधारण सभा शनिवारीं ता. २९ सप्टेंबर १९५१ रोजीं दुपारीं २ वाजतां (स्टँ. टा.) बँकेच्या रजिस्टर्ड कचेरींत (सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई) खालील कामाकरितां भरविण्यांत येणार आहे.

१. ३० जून, १९५१ रोजीं संपणाऱ्या वर्षाचें तपासलेलें ताळेबंद, नफातोटा-पत्रक व संचालक मंडळाचा अहवाल स्वीकारणें.

२. नफा-वाटणीचा दर जाहीर करणें.

३. पुढील प्रमाणें ठराव युक्त वाटल्यास विचारांत घेणें व तो स्वीकारणें.

ठरविण्यांत येतें कीं पोटनियमांमध्यें पुढील दुरुस्त्या (ज्या छापून नोटिशीबरोबर माहितीसाठीं जोडण्यांत येत आहेत) मंजूर करून स्वीकारणें.

४. हिशेबतपासनिसांची नेमणूक करून त्यांचा मेहनताना ठरविणें.

संचालक मंडळाच्या हुकुमान्वयें

व्ही. पी. वर्दे

मुंबई ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर

---

मार्गाच्या तबदिलीचें काम (ट्रॅन्स्फर बुकें) ता. १७-९-५१ ते २९-९-५१ पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद राहील.

डिव्हिडंड मंजूर झाल्यास ता. १५ सप्टेंबर १९५१ रोजीं रजिस्टरमध्यें ज्या भागिदारांचीं नांवें दाखल असतील त्यांना सोमवार ता. १५ ऑक्टोबर १९५१ पासून मुंबई ऑफिसमध्यें त्यांची रक्कम मिळूं शकेल.

### अमेरिकन नागरिकांची विफलतेची भावना

न्यूज वीक ह्या अमेरिकन नियतकालिकानें अमेरिकेंत करण्यांत यणाऱ्या आत्महत्त्यांविषयीं पुढील माहिती प्रसिद्ध केली आहे. अमेरिकेंत दरसाल सुमारें १,००,००० व्यक्ती आत्महत्त्येचे प्रयत्न करतात. त्यापैकीं सुमारें १७,००० लोकांनाच यश येतें. आत्महत्त्या करणाऱ्या व्यक्तींच्या संख्येंत स्त्रिया बऱ्याच अधिक आढळतात परंतु जे प्रयत्न यशस्वी होतात त्यांत मात्र पुरुष जास्त असतात. तीन पुरुषांनीं मृत्यूला कवटाळण्यांत यश मिळविलें तर एका स्त्रीला यश मिळतें असें हें प्रमाण आहे. बहुतेक स्त्रिया कोणत्या तरी विषप्रयोगाचा आश्रय करतात, ही पद्धत फारशी यशस्वी होत नाहीं असें दिसून आलें आहे. पुरुषापैकीं एक तृतीयांश पुरुष विषप्रयोग करून घेतात. मृत्यूच्या आधीन होण्यासाठी स्त्रिया हमखास उपायांचा अवलंब कां करीत नाहींत. ह्यासंबंधी मानसशास्त्रज्ञ विचार करूं लागले आहेत. एक मत असें आहे कीं, स्त्रिया मानसिक दृष्ट्या मरण्यास कमी तयार असतात; दुसरें असें आहे कीं, यातनारहित मृत्यु स्त्रियांना अधिक मानवतो. बहुधा ह्या दोन्ही कारणांत थोडेंबहुत तथ्य असावें. वयाच्या दृष्टीनें विचार करतां वयस्कर लोकांमध्यें आत्महत्त्येची प्रवृत्ति अधिक प्रमाणांत दिसून येतें तितकी ती तरुण लोकांत दिसत नाहीं. १९३० ते १९३५ सालाच्या दरम्यान ज्या आत्महत्त्या झाल्या त्यांत ४५ ते ५४ पर्यंतच्या वयाचे लोक अधिक होते. अलीकडे होणाऱ्या आत्महत्त्यांत वय साधारणपणें ५५ च्या पुढें असतें असें आढळून आलें आहे. ह्यासंबंधीं जीं कारणें दाखविण्यांत आलीं आहेत तीं फारच उद्बोधक आहेत. पहिलें कारण असें आहे कीं, अमेरिकन लोकांत वय झालेल्या स्त्री-पुरुषांविषयीं आदराची व सहानुभूतीची वृत्ति दिसून येत नाहीं. अमेरिकन नागरिकांपैकीं दोन तृतीयांश लोकांना आपली लोकांना जरूर नाहीं असें वाटतें. त्यामुळें दुसऱ्याला आपली अडगळ नको अशी भावना त्यांच्यांत निर्माण होते. ह्या भावनेचा परिणाम निरुत्साहांत आणि निरुत्साहाचा आत्महत्त्येच्या प्रयत्नांत होतो. लौकिक दृष्ट्या वैभवाच्या शिखरांवर नांदत असलेल्या अमेरिकन समाजांत विफलतेची भावना किती मोठ्या प्रमाणावर नांदत आहे तें वरील माहितीवरून दिसून येतें.

---

**न्यूझीलंडची फटाकड्यांना मागणी**—नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यांत न्यूझीलंडमध्यें गाय फॉक्स दिन पाळण्यांत येणार आहे. त्या प्रसंगीं उडविण्यासाठी म्हणून भारतीय फटाकड्यांस व दारूकामास मागणी येत आहे. ब्रिटिश पार्लमेंट दारूगोळ्यानें उडवून देण्याचा कट करणारा म्हणून गाय फॉक्स ही व्यक्ती इतिहासांत प्रसिद्ध आहे.

**मद्रास सरकारचें नवें कर्ज**—मद्रास सरकारनें चालू महिन्याच्या मध्याच्या सुमारास ३ कोटी रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे. युद्धोत्तर पंचवार्षिक कार्यक्रमापैकीं पाटबंधारे आणि वीजपुरवठा योजना ह्यांच्यासाठी वरील कर्ज काढण्यांत येणार आहे. हा सर्व सरकारच्या मालकीचे रोखे विकून करावा असें सुचविण्यांत आलें होतें. आतां सर्व रोखे विकावे लागणार नाहींत.

**ग्वायनामध्यें हिऱ्यांचा शोध**—ब्रिटिश ग्वायनामधील गुपुनी नदीच्या पात्रांत ५० कॅरट वजनाचे कांहीं हिरे सांपडल्यानें हिरे शोधणाऱ्या लोकांची तिकडे रीघ लागली आहे. गेल्या कित्येक वर्षांत इतक्या वजनाचे हिरे ह्या वसाहतींत सापडले नव्हते. हिरे शोधणाऱ्या खाणी कामगारांसाठी जेवणाखाण्याची सोय करण्यांत येत आहे.


## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवीवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिस:—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९९,३८५ |

**एकूण खेळतें भांडवल ६३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B. }
श्री. नी. ना. क्षीरसागर } मॅनेजिंग डायरेक्टर.





हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ९२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.